**क्र.का.१२/मुद्रांक परतावा/२६५/०६**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराट्र राज्य, पुणे यांचे  कार्यालय,पुणे १.**
**दिनांक :  ०३/८/२००६**

**विषय :- मुद्रांक शुल्क परताव्याची देयके तयार करणे व कोषागारात सादर करून धनादेश प्राप्त करून घऊन पक्षकारास देण्याबाबत...**

## प रि प त्र क :-

माहे जुलै २००६ मध्ये झालेल्या कामकाज आढावा बैठकीत मुद्रांक शुल्क परतावा प्रकरणांबाबत आढावा घेतांना असे निदर्शनास आले की, कांही मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये मुद्रांक शुल्क परतावा मंजूर केल्यानंतर परताव्याची देयके बनवून रद्द केलेल्या मुद्रांकासह संबंधित पक्षकारांकडे दिली जातात आणि संबंधित पक्षकार कोषागाराकडून धनादेश प्राप्त करून घेतात. या पद्धतीबाबत लेखा व अधिदान कार्यालय, मुंबई नुकताच आक्षेप व्यक्त केलेला आहे व सदर आक्षेप योग्य आहे व सदर आक्षेप योग्य आहे. अशी खात्री झाल्यावरून विषयांकित बाबतीत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत -

१) मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी मुद्रांक परतावा  आदेश द्विप्रतीत पारित करावेत, पैकी एक प्रत संबंधित पक्षकारास द्यावी व दुसरी प्रत संबंधित कोषागार अधिकारी यांना देण्याकरिता कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडे रद्द केलेल्या मुद्रांकासह सुपुर्द करावी.

२) मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयातील आहरण  व संवितरण अधिकाऱ्याने परतावा देयक तयार करून त्यासोबत आदेशाची प्रत व रद्द केलेले मुद्रांक जोडून ते देयक कोषागार अधिकारी यांचेकडे सादर करावे, कोणत्याही परिस्थितीत देयक व सहपत्र संबंधित पक्षकारांकडे सुपुर्द करू नयेत.

३) देयक मंजूर झाल्यानंतर कोषागाराकडून धनादेश प्राप्त करून घेऊन त्याची नोंद परतावा नोंदवहीमध्ये घेऊन संबंधित पक्षकारास धनादेश देण्यात यावा. या धनादेशाबाबतची नोंद कार्यालयाच्या सर्वसाधारण रोकडवहीमध्येदेखील घेणे आवश्यक राहील. देयक मंजूरीपूर्वी

कोषागाराकडून काही आक्षेप घेण्यात आल्यास त्याची पुर्तता आहरण व संवितरण अधिकारी यांनीच करावयाची आहे.

या संदर्भात असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, महाराष्ट्र कोषागार नियमावली १९६८ चे नियम ३८५ नुसार परताव्यासाठी अन्य नमुना विहित करण्यात आला नसेल तर नमुना ४३ नुसार देयके तयार करावयाची आहेत. सदर नियम विचारात घेऊन आहरण व संवितरण अधिकारी यांनी योग्य नमुन्यात देयके तयार करावीत.

मुद्रांक रद्द करण्याचे बाबतीत ज्या प्रकरणात फ्रँकींग मुद्राकांचा संबंध असेल तेथे फ्रँकींग मुद्रांक रद्द करणे असा अर्थ घ्यावा. ज्या प्रकरणांमध्ये दस्तऐवजाला लावलेल्या मुद्रांकापैकी अंशतः मुद्रांकाचा परतावा द्यावयाचा असेल त्याबाबतीत यापूर्वीच्या सूचनांप्राणे उक्त दस्तऐवजावरील मुद्रांक अंशतः रद्द करून अंशतः शिल्लक ठेवले असे मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र व दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत देयकासोबत जोडावयाची आहे.

सदर सूचना मुंबई विभागातील मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयांसाठी देखील लागू आहेत व त्यांचेबाबतीत कोषागार अधिकारी याचा अर्थ लेखा व अधिदान अधिकारी असा देण्यात यावा.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

**सही /-**
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करीता.**

**प्रति,**
**१) सर्व दुय्यम निबंधक**

**प्रत -**
**१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई**
**२) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक**
**३) कोषागार अधिकारी/लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई (संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेमार्फत)**